**R.C.C. No.392/2024**

**State of Maharashtra**
**Vs.**
**Akash Tanaji Pawar and others**

निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

सदर खटल्यात आज आरोपी क्र.१ ते ४ न्यायालयात हजर आहेत. सदरचा खटला आरोपींची हजेरी व त्यांचेविरुध्द दोषारोप निश्चित करण्याकरीता ठेवलेला आहे. सदर खटल्यात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ४१७, ४९४ सह कलम ३४ सह दोषारोप दाखल केलेले आहे. आज प्रकरण आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित करण्याकरीता असल्याने संपुर्ण अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. फिर्यादीचा जबाब, प्रथम खबर तसेच फिर्यादीच्या पुरवणी जबाबात आरोपी क्र.४ पुजा दशरथ चौगुले यांचेविरुध्द कोणतेही आरोप करण्यात आलेले नाहीत. तसेच, वर उल्लेखित दस्तऐवजांमध्ये आरोपी क्र.४ पुजा दशरथ चौगुले यांचा फिर्यादीशी काय संबंध आहे हे देखील स्पष्ट केलेले नाही. आरोपी क्र.४ विरुध्द केलेले आरोप हे निराधार असून अशा परिस्थितीत आरोपी क्र.४ पुजा दशरथ चौगुले यांचे विरुध्द दोषारोप निश्चित करणे योग्य होणार नाही. सबब, आरोपी क्र.४ हिला दोषमुक्त करणे योग्य राहील. म्हणुन मी खालिल आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. आरोपी क्र.४ पुजा दशरथ चौगुले हिस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३९ अंतर्गत भारतीय दंड विधानाचे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ४१७, ४९४ सह कलम ३४ मधुन दोषमुक्त (Discharge) करण्यात येते.

२. आरोपी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द दोषारोप निश्चित करण्यात येतात.

LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE

( एल.व्ही. श्रीखंडे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
न्यायालय क्र. ३, खडकी, पुणे

दिनांकः २५/०९/२०२५.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Gupte (Grade- III) |
| Name of the Court | : | Shri. L. V. Shrikhande,<br>J.M.F.C. Court No. 3, Khadki, Pune |
| Date | : | 25.09.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 25.09.2025 |
| Order uploaded on | : | 26.09.2025 |